# निविदा सुचना

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर नाथ प्राईड, उत्तर सदर बझार, सिव्हील हॉस्पीटलच्या पुर्वेस, सोलापूर पिन नं. ४१३००३ या कार्यालयात कंत्राटी शिपाई - ३ पदे या पदांची आवश्यकता आहे. या करीता नोंदणीकृत ठेकेदार / संस्था / कंपनी / एजन्सी यांचेकडून खालील अटींच्या अधीन राहून निविदा मागविण्यात येत आहे.

(१) शिपाई :- एकूण ३ पदे

१) वयोमर्यादा :- कमीतकमी १८ वर्षे व जास्तीत जास्त ४३ वर्ष राहील.

२) शिक्षण :- शिपाई पदाकरिता शिक्षण किमान बारावी पास असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर विशेष शिक्षण जसे कि टंकलेखन व संगणक अनुभव असणाऱ्यांना प्राध्यान देण्यात यावे.

३) शिपाई पदधारण करणारा व्यक्ती शारिरीक दृष्ट्या सक्षम असण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

४) शिपाई पदासाठी कार्यालयीन वेळ सकाळी ९.३० ते सांयकाळी ६.३० वाजेपर्यंत असेल.

५) शिपाई पदासाठी कार्यालयीन वेळेत ड्रेस कोड धारण करावा. त्याबाबतची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

(२) निविदांसोबत जोडलेले सर्व कागदपत्र साक्षांकित असावेत.

(३) उपरोक्त कंत्राटी पदाच्या सेवेसाठी प्रत्येक माणसाकरीता आकारण्यात आलेला कामाचा मोबदला दर हा किमान वेतन कायदा १९४८ प्रमाणे असावा. तसेच नियमितपणे पदनिर्मिती केली असता जितका खर्च शासनास येईल त्या खर्चाच्या २० % ते ३० % बचत होईल अशा रितीने प्रत्येक पदासाठी मानधन कंत्राटदाराने ठरवावे.

(४) व्यसनाधीन, गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या खाजगी कर्मचाऱ्यास नियुक्ती देता येणार नाही. कर्मचारी नियुक्ती पूर्वी कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करुन घेणे कंत्राटदारावर बंधनकार राहिल.

(५) बेशिस्त वर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यास या कार्यालयाने निर्देशित केल्यावर त्वरित काढून टाकावे लागेल.

(६) निविदे सोबत नोंदणीकृत ठेकेदार / संस्था / कंपनी / एजन्सी शासनमान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे.

(७) निविदाधारकास अस्तित्वात असलेल्या अनुषंगिक सर्व कायद्याचे पालन करणे बंधनकारक राहील.

(८) अंशदान निर्वाह निधी / भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनेची रक्कम प्रचलित दरानुसार मुख्य मालक म्हणून या कार्यालयातर्फे आपल्या दरात समाविष्ठ करुन त्याचा भरणा संबंधित कार्यालयास करुन, या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

(९) उपरोक्त पदांना साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक राहील. परंतु, कार्यालयीन आवश्यकतेनुसार ज्यादाची सेवा पुरविणे कंत्राटदाराची जबाबदारी राहील. अतिरिक्त देयक अदा करण्याची जबाबदारी या कार्यालयाची नसेल.

(१०) सदरील कर्मचाऱ्यांना अपघात झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कर्मचाऱ्याकडून कार्यालयास / इतरास नुकसान झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

(११) नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यास मिळणारे कोणतेही फायदे कंत्राटी कर्मचाऱ्यास देय असणार नाही.

(१२) कुठलेही कारण न देता कुठल्याही वेळी कंत्राट रद्द करण्याचे सर्व अधिकार, धर्मादाय उप आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर यांना असतील.

(१३) ठेकेदार / कंपनी / संस्थेतर्फे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व या कार्यालयावर राहणार नाही.

(१४) निविदा मंजूर झाल्यास कंत्राटदारास या कार्यालयाशी योग्य त्या मुद्रांक शुल्काचा करार करावा लागेल.

(१५) उपरोक्त तीन्ही पदाचे निविदा देत असताना, मा. धर्मादाय उप आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्याकडे सिलबंद लिफाफ्यात दिनांक १०/०३/२०२५ ते २५/०३/२०२५ पर्यंत सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत सादर करावे.

(१६) उपरोक्त तीन्ही पदांकरिताच्या स्वतंत्र निविदा लिफाफ्यामध्ये सिलबंद करुन त्यावर पदाचे नांव नमूद करुन त्या पदासाठीची निविदा असे नमूद करणे आवश्यक आहे.

(१७) सदरील निविदा सूचना https://charity.maharahstra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

सही/-

(श्री. प्र. अ. कुंभोजकर)
धर्मादाय उप आयुक्त,
सोलापूर विभाग, सोलापूर.

Scanned with OKEN Scanner